# रे.मु.नं.१४६/१५ मधील नि.क. ५ वरील आदेश

*लक्ष्मण गणपत माळी, वगैरे ... वादी*
*वि.*
*फसाबाई परशुराम माळी, वगेरे ... प्रतिवादी*

१) वादीने सदरचा अर्ज दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी स्वत: अगर इतरांमार्फत दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे त्रयस्थ इसमाचे हक्क संबंध प्रस्थापित करु नये तसेच दावा मिळकतीतील वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे.

२) अर्जात वादीचे कथन की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादींचे आजोबा कै.जैतू देहू माळी यांच्याकडे संरक्षित कुळ म्हणून कसण्यास होत्या. या मिळकतीबरोबरच मौजे अंजप येथील इतर मिळकती देखील जैतू यांच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत होत्या. जैतू यांना प्रतिवादी क्र. १ चे पती व प्रतिवादी क्र. २ ते ७ यांचे वडील कै.परशुराम हा मोठा मुलगा व वादी क्र. १ ते ६ यांचे वडील गणपत हा दुसरा मुलगा होता. त्यांची मुलगी शांताबाई ही सध्या मयत आहे. जैतू यांच्या हयातीत परशुराम व गणपत हे सर्वजण एकत्र हिंदू कुटुंबात रहात होते व दावा मिळकती एकत्रात सामाईकपणे कसत होते.

३) वादीचे पुढे असे कथन की, जैतू हे सन १९७१ चे सुमारास मयत झाले. त्यांच्या मृत्युनंतर दोन्ही मुले परशुराम व गणपत हे वादी व प्रतिवादीसह हिंदू एकत्र कुटुंबात राहून दावा मिळकती कसत होते. परशुराम हा मोठा असल्याने तो घराचा कर्ता होता. १९७६ चे सुमारास परशुराम व गणपत यांनी आपआपसात समजूतीने रितसर जमीनीचे वाटप करुन घेतले व

ते वेगळे राहू लागले. वाटपानुसार परशुराम व गणपत त्यांच्या हिश्याला आलेल्या मिळकती स्वतंत्रपणे कसू लागले. दावा मिळकतीतील हिस्सा गणपतच्या मृत्युनंतर वादी ताबेकब्जात ठेवून कसू लागले. या वाटपासंदर्भात मौजे अंजप येथील फेरफार क्र. ६२५ रितसर मंजूर झाला मात्र महसूल खात्याच्या चुकीमुळे सदर फेरफाराचा अंमल दावा मिळकतीचे सातबारा उता-यास देण्याचे राहून गेले व दावा मिळकतीच्या संपूर्ण क्षेत्रास सातबारा उता-यास केवळ परशुराम याचे नाव तसेच राहीले. पण प्रत्यक्षात दावा मिळकतीतील अर्धे क्षेत्र वादीचे कब्जेवहिवाटीत आहे. सदर जमीनीची कुळ कायदा कलम ३२ग प्रमाणे किंमत परशुराम याचे नावे ठरविण्यात आली. त्याबाबत फेरफार क्र. ७९० मंजूर झाला. केवळ याचा फायदा घेवून परशुराम यांनी त्यांचे हयातीतच दावा मिळकतीपैकी सर्व्हे नं. २१/७ या संपूर्ण क्षेत्राची मिळकत वादीचे अपरोक्ष दि.२८.१२.१९९९ रोजी प्रतिवादी क्र. ८ यांना बेकायदेशीररीत्या खरेदी दिली. सदरचे खरेदीखत वादी व त्यांचे पूर्वाधिकारी यांचे अपरोक्ष झाले होते. ते वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही.

४) वादीचे पुढे असे कथन की, दावा मिळकतीस परशुराम याचे स्वतंत्रपणे कुळ असे कधीही नाव लागले नाही किंवा तसा फेरफारही मंजूर झालेला नाही. जैतू यांनी दावा मिळकतीचा ताबा सावकारास परत केल्याबाबत फेरफार क्र. ४०८ मंजूर करणेत आला, तरीही प्रत्यक्षात दावा मिळकती या जैतू यांचे ताबेकब्जात होत्या व त्यांचे पश्चात परशुराम व गणपत यांचे ताबेकब्जात होत्या. सामबारा उता-यास परशुराम याचे एकटयाचे नावाची नोंद होती. त्याचे मृत्युनंतर दावा मिळकतीचे संपूर्ण क्षेत्रास वारस म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेच नावाची नोंद करण्यात आली. त्यावरुन फेरफार क्र. १५४४ तयार करण्यात आला. त्यास गणपत यांनी रितसर हरकत नोंदविली. त्याची सुनावणी नायब तहसिलदार, कर्जत यांचेसमोर झाली. त्यामध्ये प्रतिवादी यांनी वकीलांमार्फत दिलेला जबाब

पहाता त्यामध्ये प्रतिवादींनी फेरफार क्र. ६२५ नुसार झालेले वाटप स्पष्टपणे मान्य केलेले आहे. तसेच या फेरफारानुसार गणपत यांचे नावे असलेल्या मिळकती त्यांना देण्यास हरकत नसल्याचे देखील कबूल केले आहे. त्याप्रमाणे नायब तहसिलदार यांनी आदेश केला व त्याचा अंमल सातबारा उता-यावर झाला. या आदेशाविरुध्द प्रतिवादी यांनी उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडे अपिल दाखल केले. त्या अपिलाचा निकाल देखील वादींचे लाभात झाला. त्या आदेशाविरुध्द प्रतिवादींनी पुन्हा अप्पर जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे दुसरे आर.टी.एस. अपिल दाखल केले. त्याचा निकाल वादीचे विरुध्द लागला. त्यामुळे वादी यांनी त्याविरुध्द अप्पर आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचेकडे रिव्हिजन अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज फेटाळण्यात आला त्यामुळे वादींनी मा.महसूल मंत्री, मंत्रालय, मुंबई यांचेकडे रिव्हीजन अर्ज दाखल केलेला आहे, जो प्रलंबित आहे.

५) वादीचे पुढे असे कथन की, अप्पर जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे दावा मिळकतीस प्रतिवादींचे नावाची नोंद झाली आहे. परंतु प्रत्यक्षात दावा मिळकती या वादींचे ताबेकब्जात आहेत. सातबारा नोंदीचा गैरफायदा घेवून प्रतिवादींचे पूर्वाधिकारींनी दावा मिळकतीतील सर्व्हे नं.२१/७ प्रतिवादी क्र. ८ चे नावे विक्री केली. तसेच प्रतिवादी इतर मिळकती त्रयस्थ इसमांना विकण्याचा जोरदार प्रयत्नात आहेत. असे झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. दावा मिळकतीमध्ये वादींच्या अर्ध्या हिश्याची मालकी तसेच कब्जेवहिवाट आहे हे ठरवून मिळण्यासाठी वादीने दावा दाखल केला आहे. सदरचा दावा गुणदोषावर चालून अंतिम निकाल होण्यास बराच कालावधी जाणार आहे. दरम्यानचे काळात प्रतिवादी दावा मिळकती विक्री करतील अशी साधार भिती वादीना वाटत आहे. त्यासाठी दि.०२.१२.२००२ रोजी प्रतिवादींनी काही गि-हाईकांना दावा मिळकतीचे ठिकाणी बोलवून विक्री संबंधी चर्चा केली.

यामुळे वादीचे कब्जेहक्कास हरकत होते. त्यामुळे सदरचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज वादीने दाखल केला. वादीने त्याच्या अर्जाचे पुष्टयर्थ्य नि.क्र. ६ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

६) सदर अर्जास प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला आहे. प्रतिवादींचे कथन की, दाव्यास एस्टॉपल या तत्वाची, तसेच त्यास महसूल कायदयाच्या तरतुदीची बाधा येत आहे. दावा मुदतबाहय आहे. फेरफार नोंद क्र. ४०८ नुसार जैतू माळी यांचे संरक्षित कुळ म्हणून असलेले नाव कमी करण्यात आले. त्यानंतर सर्व मिळकती या मूळ मालक आरेकर यांच्या नावे करण्यात आल्या. जरी १९७६ साली फेरफार क्र. ६२५ नुसार वाटप झाल्याचे नमूद झाले असले तरी त्या फेरफारचा कागदोपत्री अंमल झालेला नाही कारण मूळात ती फेरफार नोंद चुकीची होती.

७) प्रतिवादींचे पुढे असे कथन की, जमीन मालक श्री.आरेकर यांचे नावे असलेल्या दावा मिळकती परशुराम माळी यांचे वहिवाटीत होत्या. उर्वरित काही मिळकती गणपत माळी याचे ताब्यात होत्या. परशुरामचे ताब्यात असलेल्या मिळकतीसंदर्भात १९८१ साली कुळ कायदा, कलम ७०ब प्रमाणे रितसर अर्ज देवून कायदेशीररित्या खरेदीची किंमत ठरवून कुळ कायदा कलम, ३२ प्रमाणे खरेदीचे प्रमाणपत्र परशुराम यांना देण्यात आले. त्या आदेशास आजतागायत वादी किंवा पूर्वजांनी हरकत नोंदविलेली नाही. हक्क नोंद क्र. ७९० प्रमाणे परशुराम याचे नावाची नोंद दावा मिळकतीस कायदेशीरपणे झाली आहे. यामध्ये वादींचा कोणताही संबंध नाही. परशुरामचे पश्चात हल्लीचे प्रतिवादी यांनी सदर मिळकतीस वारसांची नोंद होण्यासाठी अर्ज केल्यानुसार फेरफार क्र. १५४४ ही नोंद करण्यात आली. या नोंदीस गणपत माळी यांनी हरकत नोंदविली. पण त्यांनी १९८३ साली झालेला ३२-ग खालील आदेश तसेच फेरफार नोंद क्र. ७९० यास आव्हानित केले

नाही. मा.अप्पर जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी फेरफार क्र. १५४४ ची नोंद कायम केली आहे. अप्परायुक्त कोकण विभाग यांनी देखील सदर नोंद फायनल केली आहे. वादींनी उपस्थित केलेल्या वादाचे स्वरुप हे महसूल न्यायालयाच्या अखत्यारीतील असल्याने या न्यायालयास त्याबाबत आदेश करण्याचा अधिकार नाही.

८) प्रतिवादींचे पुढे असे कथन की, १९९९ साली प्रतिवादी क्र. ८ यांना सर्व्हे नं. २१/७ चे संपूर्ण क्षेत्र विक्री करण्यात आले पण त्याबाबतीत आजतागायत वादींनी कुठेही दाद मागितलेली नाही. त्यामुळे त्यांचा दावा मुदतबाहय आहे. अशा सर्व कारणानुसार वादींना सकृतदर्शनी प्रकरण नसल्याने त्यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

९) अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन करुन खालील मुददे माझे विचारार्थ उत्पन्न झाले आहेत. त्यांचा त्यावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) वादीस सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | ... अंशत: होय. |
| २) न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे का ? | ... अंशत: होय. |
| ३) तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादींचे अपरिमीत असे नुकसान होणर आहे का ? | ... अंशत: होय. |
| ४) आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

१०) वादीने त्याचे अर्जाचे पुष्टयर्थ्य अभिलेखावर बरेच कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यापैकी नि.क्र. ४ चे लिस्टापोटी दावा मिळकतीचे सातबारा

उतारे, फेरफार क्र. ३१४, ६२५, ७९०, १५४४, १०९२ चे उतारे, मा. तहसिलदार तसेच उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या प्रती, अप्पर जिल्हाधिकारी, रायगड व अप्पर आयुक्त कोकण विभाग यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या प्रती, मा.महसूल मंत्री, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या रिव्हीजन अर्जाची छायांकित प्रत तसेच दावा मिळकतीबाबत वादींनी भरलेल्या धा-याच्या पावत्या दाखल केल्या आहेत.

११) त्यानंतर वादीने नि.क्र. १६ चे लिस्टापोटी दावा मिळकतीचे सन १९५२-५३ पासून सन १९८१-८२ पर्यतचे सातबारा उतारे, दावा मिळकतीचे सन २०११-१२ रोजीचे सातबारा उतारे, फेरफार क्र. १६६४ व १७७६ चे उतारे तसेच नि.क्र. २० चे लिस्टापोटी प्रतिवादी यांनी नायब तहसिलदार यांचेकडे हरकत अर्जावर दिलेल्या जबाबाची प्रत, तसेच बाळू माळी यांनी निवासी नायब तहसिलदार यांना दिलेल्या पत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच पुन्हा वादीने नि.क्र. २७ वर खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केली आहेत. त्यामध्ये फेरफार क्र. ६२५ ची छायांकित प्रत व वादीने प्रतिवादीचे विरोधात केलेल्या एन.सी. ची छायांकित प्रत दाखल केले आहेत.

१२) त्याचप्रमाणे प्रतिवादीने नि.क्र. १९ वर सर्व्हे क्र. १०/३+४ व सर्व्हे क्र.९/१ चे सातबारा उतारे, परशुराम यांनी भरलेल्या धा-याच्या पावत्या (एकूण ३४), फेरफार क्र. ४०८ ची प्रत दाखल केली आहे.

**<u>मुददा क्र. १ ते ३</u>** :-

१३) तिनही मुदयांसाठी लागणारा पुरावा एकच असलयाने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तिनही मुददे एकत्रात चर्चिले आहेत.

१४) सदरचा अर्ज नि.क्र. ५ साठी असल्याने कागदपत्रांची कायदेशीरपणे शाबीती होण्यापूर्वी त्यांना चर्चिण्यात येणार आहे.

१५) वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादी वकीलांचे कथन की, दावा मिळकतीत जैतू माळी हे संरक्षित कुळ म्हणून होते. त्यांचे पश्चात दावा मिळकतीस परशुराम व गणपत यांची वारस म्हणून नोंद झाली. १९७६ मध्ये त्यांच्यामध्ये वाटप झाले व त्यानुसार फेरफार क्र. ६२५ मंजूर करण्यात आली. पण सदर फेरफारचा अंमल सातबारा पत्रकी देण्यात आला नाही. परशुराम हा घरातील मोठा असल्याने कर्ता म्हणून दावा मिळकतीस त्याचे नावाची नोंद झाली. गणपत हा अडाणी असल्याने व दावा मिळकती वाटपाप्रमाणे वहिवाटत असल्याने त्याने त्याबाबत कधीही हरकत घेतली नाही. पण परशुरामचे पश्चात प्रतिवादींनी सर्व दावा मिळकतीस वारस म्हणून त्यांची नोंद करुन घेतली व त्यानुसार फेरफार क्र. १५४४ तयार करण्यात आला. ज्यास प्रथमतः वादीचे पूर्वाधिकारी यांनी हरकत घेतली. सदरचे प्रकरण तहसिलदार, कर्जत यांचेपुढे चालले. त्यांचेसमोर प्रतिवादींनी दिलेल्या जबाबाचे अवलोकन करता त्यांनी फेरफार क्र. ६२५ अन्वये झालेले वाटप मान्य केले आहे. तसेच प्रतिवादी बाळू परशुराम माळी यांनी देखील त्याचे जबाबात फेरफार क्र. ६२५ नुसार झालेले वाटप मान्य करुन वादींची कब्जेवहिवाट मान्य केली आहे. त्यानुसार मा.नायब तहसिलदार यांनी वादींची हरकत निकाली करुन फेरफार क्र. १५४४ हा रदद करणेबाबत आदेश केला. ज्यावर प्रतिवादींनी उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडे अपिल दाखल केले. जे फेटाळण्यात आले. त्या आदेशाविरुध्द प्रतिवादींनी अप्पर जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचेकडे दुसरे अपिल केले. तेथे वादीचे विरुध्द निकाल लागला. त्या निकालाविरुध्द वादींनी अप्परआयुक्त कोकण विभाग मुंबई यांचे आरटीएस रिव्हीजन दाखल केले ते फेटाळण्यात आले. त्या विरुध्द वादीने हल्ली मा.महसूल मंत्री, मंत्रालय, मुंबई यांचेकडे रिव्हीजन

अर्ज दाखल केला आहे, तो प्रलंबित आहे. पण या दरम्यान प्रतिवादी यांच्या नावाची नोंद पुन्हा सातबा-यात झाली आहे. ज्याचा गैरफायदा घेवून ते दावा मिळकती विल्हेवाट लावण्याचे तयारीत आहेत. यापूर्वीही त्यांनी दावा मिळकतीतील सर्व्हे २१/७ मधील संपूर्ण क्षेत्र वादीची संमत्ती न घेता प्रतिवादी क्र. ८ यास विक्री केली आहे. त्यामुळे सातबारा उता-यास त्यांच्या असलेल्या नावाचा गैरफायदा घेवून प्रवितादी दावा मिळकतीची विक्री करतील अशी साधार भिती वादी यांना वाटत आहे. दाव्याचा अंतिम निकाल लागण्यास बराच कालावधी असल्याने प्रतिवादींना तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी.

१६) वादी वकीलांनी या न्यायालयाचे लक्ष फेरफार क्र. ३१४ वर केंद्रीत केले ज्यानुसार जैतू माळी यांची दावा मिळकतीत संरक्षित कुळ म्हणून नोंद करण्यात आली होती. त्यानंतर फेरफार क्र ६२५ नुसार जैतू माळी यांचे पश्चात परशुराम व गणपत यांच्या हिश्यास देण्यात येणा-या मिळकती नमूद करण्यात आल्या आहेत. ज्यानुसार दावा मिळकती या परशुराम व गणपत यांना निम्या निम्या हिश्यात देण्यात आल्या आहेत. फेरफार क्र. १५४४ नुसार परशुरामचे पश्चात प्रतिवादींचे नोंद दावा मिळकतीस करण्यात आली. फेरफार क्र. १०९२ नुसार परशुराम यांनी सर्व्हे नं.२१/७ मधील संपूर्ण मिळकत प्रतिवादी क्र. ८ यांस विक्री केली. त्यामुळे वादी वकीलांचा युक्तिवाद की, अप्परायुक्त कोकण विभाग यांच्या निर्णयानुसार फेरफार नोंद क्र. १५४४ रितसर करण्यात आली आहे. त्याचा फायदा प्रतिवादी घेत आहेत व दावा मिळकती विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत असे झाल्यास वादींचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणेत यावा

१७) याउलट प्रतिवादी वकीलांचा युक्तिवाद की, फेरफार क्र. ४०८ नुसार जैतू याचे नाव कमी करण्यात आले. फेरफार क्र. ७९० प्रमाणे १९८७

साली परशुरामने सदर मिळकत ही बोजाची किंमत भरुन खरेदी केली आहे. पण तेंव्हापासून आजतागायत वादींनी परशुराम याचे झालेल्या नोंदीबाबत कुठेही तक्रार नोंदविली नाही. वादींचेच कथनाप्रमणे १५४४ च्या फेरफार नोंदीवरुन वाद निर्माण झाला. सदरची नोंद ही २०११ मध्ये करण्यात आली पण तेव्हापासून २०१५ पर्यत वादीनी कोणताही दावा दाखल केला नाही. अप्पर आयुक्त कोकण विभाग यांचा शेवटचा आदेश नोव्हेंबर २०१५ मध्ये लागल्यानंतर वादीनीं डिसेंबर २०१५ मध्ये दावा दाखल केला आहे ज्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येत आहे. अशा स्थितीत पाश्चात बुध्दीने दाखल केलेला दावा कायदयाने चालू शकणारा नसल्याने वादीचा अर्ज नामंजूर करावा.

१८) या युक्तिवादास उत्तर देताना वादी वकीलांचे कथन की, दावा मिळकतीच्या अर्ध्या हिश्याचा ताबा वादींकडे असल्याने त्यांनी कधीही हरकत केली नाही. प्रतिवादी जेंव्हा दावा मिळकती विक्री करीत आहेत त्यावेळी वादींना दाव्यास कारण निर्माण झाले. त्यामुळे दावा मुदतीत आहे.

१९) या प्रकरणात आलेला कागदोपत्री पुरावा तसेच वादी, प्रतिवादी वकीलांच्या युक्तिवादावरुन असे स्पष्ट होते की, वादीचा भर हा फेरफार क्र. ६२५ नुसार झालेल्या वाटपावर आहे. पण प्रतिवादीचे कथन की, ६२५ या फेरफारापूर्वी ४०८ नुसार जैतू याचे नाव कमी करण्यात आले. त्यामुळे ६२५ च्या फेरफारावेळी जैतू याच्या कब्जात दावा मिळकत नसल्याने ६२५ प्रमाणे झालेली नोंद ही बेकायदेशीर आहे. त्यानुसार कोणताही अंमल झालेला नाही. पण परशुराम याने फेरफार क्र. ७९० नुसार दावा मिळकती या खरेदीची किंमत देवून खरेदी केल्या आहेत. तो एकटाच या मिळकतीचा खरेदीने मालक झाला आहे व त्याचे पश्चात प्रतिवादी हे वारसाने दावा मिळकतीचे वारस आहेत. ज्यामध्ये वादींचा कोणताही हक्क, हितसंबंध नाही.

२०) वादी वकीलांनी दावा मिळकतीचे बरेच पूर्वीचे सातबारा उतारे दाखल केले आहेत. जे सन १९५२ ते १९८४-८५ पर्यंतचे आहेत. ज्याचे अवलोकन करता दावा मिळकतीस जैतू माळी याचे तसेच १९७६-७७ साली परशुराम व गणपत यांची देखील नावे नमूद आहेत. गट क्र. ९१/४ चा सन २०११-१२ सालचा सातबारा उतारा पहाता त्यास परशुराम व गणपत यांचे नावाची नोंद आहे. तसेच गट क्र.८३/८ सन २०११-१२ चा उतारा पहाता त्यास देखील परशुराम व गणपत यांचे नावाची नोंद आहे. गट क्र. ११/३ चा २०११-१२ सालातील सातबारा उतारा पहाता त्यास देखील परशुराम व गणपत यांचे नावाची नोंद आहे. सर्व्हे नं. २१/७ चा सन १९५२-५३ चा सातबारा उतारा पहाता त्यास १९६७ पर्यंत जैतू माळी यांचे नावाची नोंद असून सन १९७६-७७ साली गणपत याचे नावाची नोंद झाली. या सर्व जुन्या सातबारा उता-यावरुन दावा मिळकती या परशुराम व गणपत यांचे नावे असल्याचे आढळून येते. पण प्रतिवादींचे कथन की, फेरफार क्र. ४०८ ने जैतू याचे नाव दावा मिळकतीतून कमी झाले. त्यामुळे या मिळकतीशी गणपत याचा काहीही संबंध नाही. प्रतिवादींचा हा युक्तिवाद ग्राहय धरला तर जैतू नंतर सदर मिळकत मालकाकडे वापस आली. पण मालकाकडून ती परशुरामकडे परत कशी गेली याबाबत प्रवितादींनी कोणतेही कथन केलेले नाही. जर फेरफार क्र. ४०८ नुसार जैतू यांची संरक्षित कुळ म्हणून नोंद कमी झाली तर परशुराम याने कुळ कायदयांतर्गत ३२-ग खाली रक्कम कोणत्या अधिकाराने भरली हे देखील प्रतिवादींनी कथन केलेले नाही. जरी फेरफार क्र. ४०८ अस्तित्वात असला तरी त्यानंतर येणारा फेरफार क्र. ६२५ हा देखील अस्तित्वात आहे. या दोन्ही फेरफारांदरम्यानचा इतर कोणताही फेरफार अभिलेखावर नाही. ६२५ नंतरचा १९८७ सालचा फेरफार क्र. ७९०, परशुरामच्या खरेदीबाबतचा, अभिलेखावर आहे. पण ६२५ पासून ७९० पर्यंतचा कोणताही फेरफार अभिलेखावर नाही. त्यामुळे या दरम्यान

नेमके काय घडले? हे स्पष्ट होत नाही.

२१) अशी स्थिती असताना वादीने दाखल केलेल्या यापूर्वीच्या सर्व सातबा-यांचे अवलोकन करता सन २०११-१२ पर्यंत दावा मिळकतीस वादीचे व प्रतिवादीचे, पूर्वाधिकारी परशुराम व गणपत यांचे नावाची नोंद आढळून येत आहे. त्यामुळे दावा मिळकती या सकृतदर्शनी सन २०१२ पर्यंत परशुराम व गणपत यांचे नावे आढळून येत आहेत.

२२) सदर बाबतीत प्रकरण हे महसूल न्यायालयात प्रलंबित आहे. पण अभिलेखावर आलेल्या कागदपत्रांवरुन सकृतदर्शनी सन २०१२ पर्यंत दावा मिळकतीस परशुराम व गणपत यांचे नावाच्या नोंदी आढळून येतात. फेरफार क्र. १०९२ प्रमाणे परशुराम यांनी सर्व्हे नं. २१/७ चे संपूर्ण क्षेत्र प्रतिवादी क्र. ८ यास विक्री केले आहे. या मिळकतीचा सन १९५२ पासूनचा सातबारा पहाता सन १९७६-७७ साली व १९८१-८२ साली गणपत याच्या नावाची नोंद आढळून येते. परशुराम यांनी प्रतिवादी क्र. ८ यास सदर मिळकत सन २००० साली खरेदी दिली. कारण सदर वेळी या मिळकतीस परशुराम याच्या एकटयाच्या नावाची नोंद होती.

२३) अभिलेखावरील जुने सर्व सातबारा उतारे व फेरफार क्र. ६२५ चे अवलोकन करता सकृतदर्शनी वादींचा दावा मिळकतीत हिस्सा असल्याचे आढळून येत आहे. अशा स्थितीत या घडीला प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास सातबा-यावर असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी दावा मिळकती ति-हाईत व्यक्तिस विक्री करतील ही वादीची भिती रास्त आहे. कारण यापूर्वी प्रतिवादी क्र. ८ यास अशाच प्रकारे विक्री करण्यात आली आहे.

२४) या अर्जाचे अवलोकन करता वादींनी दोन कारणांसाठी हा अर्ज

दाखल केला आहे. ते म्हणजे दावा मिळकतीची विल्हेवाट न करणे तसेच दावा मिळकतीतील वादीचे कब्जास हरकत अडथळा करु नये. वर नमूद केल्याप्रमाणे सातबारा उतारे व फेरफार क्र. ६२५ नुसार सकृतदर्शनी दावा मिळकतीत वादींचा हिस्सा आढळून येतो. पण तसेच दावा मिळकतीत वादींची कब्जेवहिवाट आहे हे वादींनी दाखविणे गरजेचे आहे. त्यासाठी वादींनी नि.क्र. ४ चे लिस्टापोटी अनु.क्र. १२ वर दावा मिळकतीसंबंधी भरलेल्या धा-याच्या पावत्यांच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. ज्याचे अवलोकन करता सदरच्या पावत्या या भोगवटादार म्हणून परशुराम माळी यांचे नावे असून हस्ते म्हणून गणपत माळी याचे नाव नमूद करणेत आले आहे. या पुराव्याखेरीज वादीने दावा मिळकतीतील कब्जेवहिवाट दाखविण्यासाठी इतर कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. याउलट प्रतिवादीने एकूण ३४ धा-याच्या पावत्या दाखल केल्या ज्या सर्व परशुराम याचे नावे आहेत. वादींनी दाखल केलेल्या धा-याच्या पावत्यांवरुन कोणत्या मिळकती वादीचे कब्जेवहिवाटीत आहेत याचा अढळ होत नाही.

२५) वर नमूद केल्याप्रमाणे सकृतदर्शनी अभिलेखावरील जुन्या सातबारा उता-यावरुन व फेरफार क्र. ६२५ वरुन दावा मिळकतीस वादींचे पूर्वाधिकारी यांचे नावाची नोंद आढळून येते. तसेच प्रतिवादींचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास ते दावा मिळकतीचे हस्तांतरण करतील अशी वादीस वाटणारी भिती या घडीला रास्त वाटत आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींचे बाजूने रहात आहे. अशा स्थितीत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीचे हस्तांतरण करु नये अशा प्रकारची तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींना देणे न्यायाचे होईल.

२६) परंतु वादींनी कब्जास हरकत, अडथळा करु नये अशा स्वरुपाची तुर्तातुर्त ताकीदीचीही मागणी केली आहे. पण दावा मिळकतीतील वादींचा

कब्जा शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी वादींची आहे. त्यासाठी वादींनी अभिलेखावर दाखल केलेल्या धा-याच्या छायांकित पावत्यांवरुन ते स्पष्ट होत नाही. तसेच प्रतिवादींनी वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत केली या बाबतीत ही कोणताही पुरावा अभिलेखावर देण्यात आलेला नाही. अशा स्थितीत वादींची कब्जाबाबतची तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मान्य करणे हिताचे होणार नाही.

२७) वरील सर्व चर्चेवरुन वादींनी त्यांचे सकृतदर्शनी प्रकरण अंशत: म्हणजे हस्तांतराचे बाबतीत शाबीत केले आहे. न्यायाचा समतोल व अपरिमीत नुकसान ही तत्वे देखील वादी अंशत: शाबीत करीत आहे. त्यामुळे वादींचा अर्ज अंशत: मंजूर करणे न्यायाचे होईल. कारणे मी मुददा क्र. १ ते ३ यांना अंशत: होकारार्थी नोंदवून मुददा क्र. ४ साठी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१) अर्ज अंशत: मंजूर करणेत येत आहे.

२) प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत स्वत: अगर इतरांमार्फत दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे त्रयस्थ इसमाचे हक्क, हितसंबंध प्रस्थापित करु नये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे.

३) वादींची कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा बाबतची तुर्तातुर्त ताकीद अमान्य करणेत येत आहे.

कर्जत<br>
दि.३०/०६/२०१६

(शु.भि.यादव)<br>
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.